ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# आण्णाभाऊ साठे यांच्या कथामधील दलितांचे प्रश्न व विवंचना

प्रा. जनार्धन परकाळे
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

## प्रास्ताविक



आण्णा भाऊंनी अनेक साहित्यप्रकार हाताळले असले, तरी त्यांची अंगभूत प्रतिभा ही एका कथालेखकाची होती, असे त्यांच्या साहित्याच्या जाणकार वाचक्ांचे व संशोधकाचे मत आहे. आण्णा भाऊंनी कथालेखनाला १९४९ मध्ये आरंभ केला व १९६९ मध्ये आपल्या मृत्युपर्यंत ते कथा लिहीत होते. १९४९ पासून त्यांनी बऱ्याच कथा लिहल्या असल्या, तरी त्यांचा संग्रह मात्र १९५७ पर्यंत निघू शकला नाही. याला अनेक कारणे होती - आण्णा भाऊ तेव्हा लेखक म्हणून नवीन होते, हस्तिदंती मनोऱ्यात राहणाऱ्या तत्कालीन वाचकांच्या मते आण्णा भाऊंच्या कथांचे विषय हे मुळी विषयच नव्हते, आणि तेव्हाच्या प्रकाशकांच्या आणि समीक्षकांच्या तथाकथित कलात्मक मूल्यांसाठी आग्रह होता. तरीही, या अडचणींवर मात करुन आण्णा भाऊंचा खुळवाडी हा कथासंग्रह १९५७ साली प्रकाशित झाला. उपलब्ध माहितीनुसार त्यानंतर आण्णा भाऊंचे एकूण वीस कथासंग्रह प्रकाशित झाले.

आण्णा भाऊंनी इतक्या कथा लिहिल्या, तरीसुध्दा त्यांच्या हयातीत समीक्षकांनी त्यांची फारशी दखल घेतली नाही. तत्कालीन समीक्षकांच्या कठोर व पुराणमतवादी वृत्तीमुळे कथाकार म्हणून ते उपेक्षितच राहिले. ते स्वत:सुध्दा आपले हे शल्य बोलून दाखवीत. समीक्षकांनी केलेल्या आण्णा भाऊंच्या उपेक्षेची कारणे त्यांनी मराठी कथालेखनाच्या क्षेत्रात विषय, पार्श्वभूमी, भाषा आणि शैली यांच्या संदर्भात केलेल्या युगप्रवर्तक कार्यामध्येच आहेत. त्या काळच्या श्री. ना. सी. फडके या प्रस्थापित कथालेखकांशी आण्णा भाऊंचे कुठल्याही बाबतीत साम्य नव्हते. फडके यांचा कथालेखनाच्या संदर्भात तथाकथित तंत्र व कलामूल्ये यांच्यासाठी आग्रह असे, तर आण्णा भाऊंना त्यांची कधीच पर्वा नसे. आण्णा भाऊंच्या काही कथा तर अशा आहेत, की त्यांना किस्सा म्हणावे, की दीर्घकथा म्हणावे की कादंबरिका म्हणावे हे सांगणे अवघड आहे.

आण्णा भाऊंच्या कथांबद्दल समीक्षक आणि काही नागरी वाचकांचे मत काहीही असले, तरी मराठी साहित्याच्या सर्वसाधारण व सहृदय वाचकांनी मात्र त्यांच्या कथांचे खूप स्वागत केले, त्यांना त्या कथा खूप आवडल्या. नंतर त्या कथा फक्त मराठी वाचकांपर्यंतच मर्यादित राहिल्या नाहीत, तर अनुवादांमधुन त्या सर्व प्रमुख भारतीय भाषांतील वाचकांपर्यंत पोचल्या. त्यांचे जर्मन, झेक, इंग्लिश, पोलिश, रशियन आणि स्लोवाक इत्यादी विदेशी भाषांतही अनुवाद झाले.

आण्णा भाऊ साठे यांच्या कथेचे एका वाक्यात वर्णन करावयाचे झाल्यास असे सांगता येईल की, ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणासाची कथा आहे. ही कच खाणारी, हरणारी माणसे नाहीत. या सर्वांना मानाने जगायचे आहे आणि आक्रमक वृत्तींशी निकराने लढून त्या सामन्यात त्यांना जिंकायचेही आहे.. वार झेलायला त्यांची छाती नेहमीच ताठ्याने उभारली आहे.. त्यांच्या कथामध्ये इथून तिथून एकच झुंजार मराठबाणा आवेशाने स्फुरताना दिसून येतो. या पराक्रमाच्या कथा आण्णा भाऊंनी तितक्याच तेजस्वी भाषेत रंगविलेल्या आहेत.

आचार्य अत्रे यांच्या वरील विधानांची साक्ष आण्णा भाऊंच्या खुळंवाडी या पहिल्या कथासंग्रहातील कथा देतात.

जेव्हा दलितांना अडचणी येतात आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न येतो, तेव्हा एरवी मवाळ असणाऱ्या दलितेतर व्यक्तीसुध्दा जहाल पवित्रा घेतात, असे अण्णा भाऊ आपल्या कथांमधून दाखवतात. उदाहरणार्थ खुळंवाडी संग्रहातील विष्णुपंत कुलकर्णी या कथेतील विष्णुपंत हे साधारणपणे मवाळ वृत्तीच्या ब्राह्मण समाजाचे असले, तरी १९१८ मधील दुष्काळ

आणि रोगराई यांच्यामुळे होणारे दलितांचे हाल पारून ते दलितांना क्रांतिकारी सल्ला देतात - काहीही करा, पण जगा! तुम्ही साऱ्यांनी जगायलाच हवं! ते दलितांना मठातील धान्य लुटून जगण्याचा मार्ग सुचवतात. दलित ते धान्य लुटतात. त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदवला जातो, आणि त्यांना अटक होते. पण विष्णुपंत इथेही सरकारविरुध्द लढतात आणि अटक केलेल्या दलितांना मुक्त करायला लावतात.

बंडवाला या कथेत अन्यायाविरुध्द उभा राहणारा मांग समाजातील एक तरुण आपल्याला दिसतो. या कथेत एक इनामदार एका निष्पाप मांगाची ऐंशी बिघे (हेक्टर) जमीन अगदी मामुली रकमेसाठी गहाण ठेवून घेतो. दोन पिढ्यांपर्यंत ती जमीन इनामदाराच्या ताब्यात रहाते. ज्या मांगाने ही जमीन गहाण ठेवलेली असते, त्याचा नातु तात्या ही जमीन इनामदाराच्या कचाट्यातून सोडविण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नामध्ये दोन वेळा इनामदाराला मारहाण करण्याच्या आणि त्याचा खून करण्याच्या खोट्या आरोपांखाली तात्याला तुरुंगवास सहन करावा लागतो. जमिनीचा ताबा पुन्हा मिळविण्यासाठी सारे मवाळ व कायदेशीर मार्ग जेव्हा व्यर्थ ठरतात, तेव्हा, शेवटी तात्या बंडखोर होतो.

कोंबडीचोर ही कथा गरिबीच एखाद्या व्यक्तीला चोरी करायला भाग पाडते आणि गरिबी व भूक नष्ट केल्याशिवाय चोरी आणि तत्सम गुन्हे थांबणार नाहीत हे दाखवते. स्वतंत्र भारताचे सरकार भूक आणि दारिद्र्य कमी करील अशी जनतेची अपेक्षा होती, पण अद्यापही सरकारला या कामी यश आलेले नाही अशी टिपणी या कथेत आण्णा भाऊंनी या कथेत केली आहे.

आण्णा भाऊंच्या बरबाद्या कंजारी या दुसऱ्या कथासंग्रहात जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या अनेक कथा आहेत. त्यांच्यापैकी बऱ्याचशा कथांचे स्वरुप व्यक्तिचित्रणात्मक आहे. लेखकाला ती पात्रे प्रत्यक्षात कुठे-ना-कुठे भेटलेली आहेत. या माणसांच्या जीवनातील दु:खे, गरिबी, असहायता, व्यसने, धाडसे, चतुराई, संघर्ष, अंधश्रध्दा - या साऱ्या गोष्टी आण्णा भाऊंना अगदी चांगल्या ठाऊक होत्या. त्या गोष्टीकडे आण्णा भाठऊ पांढरपेशे विरुध्द श्रमजीवी (बूर्झ्वा विरुध्द प्रॉलेटेरिएट) या आपल्या कम्युनिस्ट दृष्टीकोनातून पाहतात.

सुलतान ही कथा मार्क्सवादी दृष्टीकोनातून लिहिलेली आहे. एका माणसाचा केवळ पोट भरण्यासाठीचा आयुष्यभरचा - वीस वर्षाचा - संघर्ष आणि त्यामधील त्याचा पराभव हा या कथेचा विषय आहे. कथानायकाचे नांव सुलतान असले, तरी प्रत्यक्षात मात्र तो अगदी गरीब आणि दुर्दैवी माणुस असतो. माणूस शेवटी अन्न, वस्त्र, निवारा या आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठीच झगडत असतो. सामान्य माणूस आपले जीवन प्रामाणिकपणे, सहिष्णुपणे आणि समाजाच्या नीतिनियमांच्या चौकटीत राहून जगण्याचा प्रयत्न करतो. पण एवढे सारे करुनही आपल्याला पोटापुरते अन्नसुध्दा मिळत नाही हे जेव्हा त्याच्या लक्षात येते, तेव्हा अशा भुकेल्या माणसापुढे बंड करण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय राहत नाही.

भारतीय संस्कृतीचा एक निराशाजनक पैलू भोमक्या ही कथा दाखवते. भारतीय संस्कृती ही सात्विक, पवित्र आहे असे प्रतिपादन करणारे काही लोक भारतात आहेत, पण अण्णा भाऊ भारतीय संस्कृतीच्या या अवाजवी उदात्तीकरणाशी नेहमीच सहमत होत, असे नाही. याचे कारण म्हणजे, या देशात लाखो लोक दारिद्र्यात आणि अनेक प्रकारच्या गुलामगिरीमध्ये भरडून निघताना हे पहात होते. त्यांना जरी माणसे म्हटले जात असले, तरी त्यांना समाजात काहीही स्थान नसते. आण्णा भाऊंचा हा दृष्टीकोण भोमक्या या कथेत दिसतो.

मकुल मुलाणी ही कथा बेकारी, आणि उपजीविका कमावण्यामधली स्पर्धा ही रक्ताच्या नातेवाईकांनाही एकमेकांचे कट्टर शत्रू कसे बनवते, आणि अखेर आर्थिक स्थैर्य हाच मानवी जीवनातील आनंदाचा पाया कसा आहे, हे दाखवते. बेकारीच्या गर्तत सापडलेल्या मकुल मुलाण्याच्या कुटुंबाची ही कथा आहे. आर्थिक समस्या मकुलता माणसातून उठवतात, हे या कथेचे सार आहे.

काही कथांमध्ये आपण सत्यामध्ये कल्पनेचे मिश्रण केलेले आहे असे अण्णा भाऊंनी एके ठिकाणी म्हटलेले आहे. सापळा ही कथा त्यांच्या वरील विधानाचे उदाहरण आहे. या कथेतील काही मुलभूत घटक वास्तववादी वाटत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना आवाहन करुन जागृती निर्माण केली. त्यामुळे पूर्वी महार असलेल्या दलितांनी मेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे व मेलेल्या जनावरांचे मांस खाणे सोडून दिले. त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील दलितेतरांमध्ये वर्णाभिमानामुळे जो संताप उसळला, त्याचे चित्रण सापळा या कथे सापडते. पारगाव नावाच्या एका गावातील अस्पृश्यांनी मेलेला बैल ओढून नेण्यास दिलेला नकार, त्यामुळे उच्चवर्णियांनी केलेला अस्पृश्यांना सापळ्यात पकडण्याचा आणि वाळीत टाकण्याचा प्रयत्न, आणि अखेर अस्पृश्यांनी उच्चवर्णियावर केलेली मात - असे या कथेचे कथानक आहे.

काही काळापुर्वी दलितांमधील विविध जातींमध्येही उच्चनीचतेचा भेद कसा मानला जात असे. हे उपकाराची फेड ही कथा दाखवते. या कथेतील चांभार स्वत:ला मांगापेक्षा श्रेष्ठ मानतो व मांगाला अस्पृश्य मानतो. भारतीय समाजरचनेत अस्पृश्यता हा उच्चवर्णीय, निम्नवर्णीय व त्यांच्यापेक्षाही निम्नवर्णीय अशा स्तरांमध्ये झिरपत जाणारा एक संसर्गजन्य रोगच

होता. सापळा या कथेप्रमाणेच ही कथासुध्दा दलितांवरील अत्याचाराविरुध्दच्या डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनाचा प्रभाव व दलितांचा आत्मविश्वास वाढविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम चित्रित करते.

सामाजिक अन्याय आणि मागासलेपण दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आंदोलन सुरु केले. त्या आंदोलनाच्या परिणामांच्या विविध पैलूंचे चित्रण करणारी वळण ही आणखी एक कथा डॉ. आंबेडकरांचे आंदोलन होते ते दलित आणि दलितेत्तर समाजातील पूर्वग्रह आणि वर्तणूक यांच्याविरुध्द. त्यांचे आंदोलन होते ते लोकांना जे जे वाईट, अनिष्ट, अमानुष आहे आमि जातिभेद निर्माण करणारे आहे ते ते सोडून द्यायला लावण्यासाठी. या हेतूनेच त्यांनी सर्व दलितांना मेलेल्या जनावराचे मांस खाण्यासारख्या आरोग्याला अपायकारक आणि घाणेरड्या सवयी सोडून देण्याचे आवाहन केले. त्यांच्या काळाच्या दलितांमध्ये या सवयी, हे वळण खोल रुजलेले होते. बऱ्याच दलितांना या सवयी सोडणे अवघड वाटत होते. खरे तर हे काही अपवादात्मक नव्हते, हेच वळण ही कथा दाखविते.

चिरागनगरची भुतं हा कथासंग्रह असूनही तो कादंबरीसारखा वाटतो. कारण एका कथेतली पात्रे याच कथासंग्रहातील इतर कथांमध्येही पुन्हा येतात. यामुळे चिरागनगरची भुतं ही कादंबरीसुध्दा होऊ शकली असती असे वाटते. ही भुतं म्हणजे खरे तर माणसेच असतात. पण जेव्हा आपण त्यांचे जिणे पाहतो, तेव्हा ती माणसांच्या रुपातील भुतेच वाटतात. ही माणसे मुंबईमधल्या आग्रा रोड, चिरागनगर, आझादनगर अशा भागांमधल्या नरकतुल्य झोपडपट्टयांमध्ये राहणारी आहेत. असहायता, गरिबी, अंधश्रध्दा, पिळवणूक, मद्यपान-वेश्यागमनासारखी व्यसने, उपेक्षा, व्यभिचार, चोऱ्यामाऱ्या या गोष्टींनी ती वेढलेली आहेत. त्यांचे जिणे पाहून अगदी भुतांनासुध्दा स्वतःची शरम वाटेल, असे आण्णा भाऊ म्हणतात. सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक अन्यायामुळे ही भुतं वेडी झाली आहेतच ती आनंद आणि दुःख या संकल्पनांचा अर्थ बदलून जगत आहेत. तुरुंगवास, फसवणूक, खून, दरोडे हे त्यांच्या आयुष्याचे अभिन्न भाग आहेत.

भुतांची धुळवड या कथेत ही भुतं धुळवड या कशा भयानक प्रकारे साजरी करतात याचे चित्रण आहे. अंतोन आणि पेंटर ही दोन भुतं दारु चढलेल्या अवस्थेत घोड्यावर बसून पोलिस स्टेशनवर जातात आणि तिथल्या पोलिस इन्स्पेक्टरला सॅल्यूट ठोकतात. ही धाडसी कृती ते करतात याचे कारण ते साहसी असतात हे नसते, तर याचे कारण असते त्यांना चढलेली दारु, दारुच्या धुंदीत ते नाचही करतात.

## संदर्भ

१)कऱ्हाडे, सदा : अण्णा भाऊंचे कथाविश्व (मुंबई : प्रगत साहित्यसभा, १९७०)

२) गायकवाड, आसाराम (संपादक) : लोकशाहीर तथा लोकलेखक आण्णा भाऊ साठे संदर्भग्रंथ (नासि : झेप प्रकाशन, १९९६).

३) गुरव, बाबूराव : आण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि साहित्यविवेचन (मुंबई : लोकवाङ्‌मय गृह, १९९१)